# जैन जागृति

www.jainjagruti.in

वर्ष ४७ वे • अंक ८ वा • एप्रिल २०१६ • किंमत ५० रु. • पृष्ठसंख्या २१६

संस्थापक – स्व. कांतीलालजी चोरडिया • संपादक – संजय के. चोरडिया, सौ. सुनंदा चोरडिया


परस्परोपग्रहो जीवानाम्

## ।। भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक अंक ।।


JITO CONNECT 2016 PUNE

Together... Towards Tomorrow

8, 9 & 10 April 2016

at Gangadham Chowk, Pune - 37.

## "जितो कनेक्ट २०१६–पुणे"

### आंतरराष्ट्रीय संमेलन व परिषदेचे आयोजन

दि. ८,९ व १० एप्रिल २०१६ – धर्म, कर्म आणि ज्ञानाचा त्रिवेणी संगम ✻ व्यापार वृध्दीची सुवर्ण संधी

सर्वांना आग्रहाचे आमंत्रण – जितो पुणे




श्री. खरतरगच्छ महासंमेलन – पालिताना तीर्थ



संचेती ट्रस्ट, पुणे – पुस्तक प्रकाशन




रामगढ मिनरल्स व राजस्थान सरकार – MOU



श्री. के. व्ही. कोठारी, पुणे – अमृत महोत्सव



श्री. हिरालालजी – सौ. कमलाबाई सुराणा पुरस्कार



सुर्यदत्ता इन्स्टिट्यूट, पुणे – पुरस्कार



भारत वुलन हाऊस "Mohey" – उद्घाटन



अल्फा डायग्नोस्टिक्स्, पुणे – मेमोग्राफी शिबीर





श्री. भंवरलालजी जैन (जैन इरिगेशन)

# पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन व्यक्तीमत्व आणि कर्तृत्व

**लेखक : सुनिल सांखला पुणे.**

**सार्थक करू या जन्माचे।**
**रूप पालटू वसूंधरेचे।।**



हे मिशन कायम डोळ्यांसमोर ठेऊन आगळ्या-वेगळ्या कार्यसंस्कृतीमुळे विश्वविख्यात झालेले आदरणीय पद्मश्री डॉ. भवरलालजी हिरालालजी जैन हे एक कर्तृत्ववान व्यक्तिमत्व.

आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीद्वारे सदैव घेतलेला कामाचा ध्यास, कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा, कमालीची जिद्द, विलक्षण चिकाटी या जीवनमुल्यांसह भाऊंनी सर्वांना कायम प्रेरणा दिली आहे. शेती आणि शेतकऱ्यांशी आयुष्यभर बांधिलकी त्यांनी जपली होती. जल व्यवस्थापनासाठी संपुर्ण आयुष्य समर्पित करणारे कृतिशिल 'जलसाधक' म्हणूनच आपण त्यांना ओळखतो. 'शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर उमललेलं हास्य हाच माझ्या आयुष्यातील सर्वोच्च पुरस्कार!' असे मानणाऱ्या भवरलालजींना आणि त्यांनी स्थापन केलेल्या जैन इरीगेशन कंपनीला दीडशेच्यावर महाराष्ट्र राज्याचे तसेच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरही मानसन्मान प्राप्त झाले. भारत सरकारद्वारा पद्मश्रीचा बहुमानही त्यांना प्राप्त झाला. विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे 'क्रॉफर्ड रीड मेमोरीयल अवार्ड' मिळविणारे भारतातील ते एकमेव भूमिपुत्र!

'ग्लोबल वॉर्मिंग'च्या असाध्य संकटामुळे होणारी पाण्याची प्रचंड कमतरता लक्षात घेता ठिबक सिंचनाच्या माध्यमातून त्यांनी जे विस्तृत असे कृषीकार्य करून दाखविले, ते निश्चितपणे देशासाठी फार मोठे योगदान होते आणि पुढेही राहील. सामान्यातल्या सामान्य शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ठिबक सिंचनाकडे अखंड यज्ञ म्हणून, व्रत म्हणून, त्यांनी पाहिले. प्रस्तुत प्रणालीचे ते आद्यप्रवर्तक. 'फॉर्च्यून'ने जगातल्या पन्नास हजार कंपन्यांमधून जैन इरीगेशनला शेतकऱ्यांचे जीवनमान बदलविणारी महत्वपूर्ण कंपनी म्हणून सातव्या क्रमांकाचे दिलेले सन्मानाचे स्थान आपणा सर्वांना ज्ञात असून महाराष्ट्राच्या एकूणच उद्योजकीय इतिहासातील ही एक वैशिष्ट्यपूर्ण घटनाच आहे.

जगप्रसिध्द अजिंठा लेण्यांची पायथ्याशी असलेल्या वाकोद या छोट्याशा खेडेगावातुन आलेल्या भवरलालजींचा संपूर्ण जगभर संचार राहिला. शेतकऱ्यांच्या घरात जन्मलेल्या या भुमिपुत्राने स्वत: शेती केली, शेतीतले खाचखळगे जाणून घेतले. हजारो लाखो शेतकऱ्यांचे भले व्हावे हे स्वप्न पाहिले आणि ते स्वप्न अखंड परिश्रमातून साकारही केले. राज्य लोकसेवा आयोगामार्फत उपजिल्हाधिकारी म्हणून काम करण्याची संधी असताना,कृषीविषयक प्रतिकूल उद्योगक्षेत्राचे आव्हान त्यांनी सक्षमपणे पेलले. पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी उद्युक्त करणारा आईचा संदेश मोलाचा मानुन आईने दिलेल्या सात हजार रूपयातून भवरलालजींनी गेल्या पन्नास वर्षात फार मोठे उद्योजकीय विश्व साकार केले. खूप यातना सहन केल्या. भवरलालजींना अनंत अडचणींचे डोंगर समोर आले. तरीही अतिशय आत्मविश्वासाने भवरलालजी चालत राहीले. भवरलालजींनी त्यांची कृषिविषयक कंपनी सात हजार रूपयांनी सुरू करून सात हजार कोटी रूपयापर्यंत नेली. आज १०,००० सहकारी त्यांच्या कंपनीत कार्यरत आहे आणि ही कंपनी जगातल्या शंभरच्यावर देशात उलाढाल करीत आहे. त्यांची ध्येयवादी वाटचाल महाराष्ट्रातल्या अनेकांना, विशेषत: जीवनाचे सार्थक

करू पाहणाऱ्या ध्येयनिष्ट नव तरूणांना अत्यंत ऊर्जा पुरविणारी आहे, हे निश्चीत!

शेतकऱ्यांचे अर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी अनेक प्रयोग त्यांनी केले. जगभरातील विद्वान, अभ्यासू, तज्ञांचा-जाणकारांचा जैन हिल्सवर सातत्याने राबता असे. भवरलालजींच्या सातत्याने सुरू राहिलेल्या कामामुळे आजपावेतो सुमारे ५० लाखांच्यावर शेतकऱ्यांचे जीवनमान बदलले. याची राज्यस्तरावर, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर वेळोवेळी नोंदही घेतली गेली. भवरलालजींची दूरदृष्टी आणि त्यांची विलक्षण कर्तबगारी जगाला थक्क करणारी. शेतीला लागणाऱ्या पाईपपासुन ते ट्युबवेलच्या केसिंग पाईपपर्यंत,उतिसंवर्धित रोपांपासून ते ठीबक सूक्ष्मसिंचन प्रणालीपर्यंत, फळप्रक्रिया ते भाजीपाला निर्जलीकरण प्रक्रियेपर्यंत त्यांनी आपल्या उद्योगविश्वाची श्रृंखला सातासमुद्रापार पोहचवली. हॉवर्ड युनिर्व्हसिटीने अन्नप्रक्रियेसंदर्भात मूलभूत कार्य करणारी जगातील एकमेव व्रतस्थ कंपनी संचलीत करणारे 'युगप्रवर्तक उद्योजक' म्हणून भवरलालजींचा गौरव केला आहे.

महाराष्ट्राचं नाव संपूर्ण जगात सातत्याने गौरवान्वित ठेवणाऱ्या भवरलालजींच्या प्रत्येक कामावर त्यांच्या उत्कृष्टतेची वैशिष्ठ्यपूर्ण मोहोर असायची! महाराष्ट्राला ही बाब भूषणावह आहेच आहे,शिवाय मराठी उद्योजक या दृष्टीनेंही ही अभिमानाची बाब होती आणि आहे. भवरलालजी महाराष्ट्र राज्याच्या सिंचन आयोगाचे सदस्य असताना त्यांनी पुढील तीस वर्षाचा कृती कार्यक्रम आराखडा तयार करून फार मोठे योगदान दिले.

भारतीय कृषिक्षेत्राला 'द्रष्टा महापुरूष' म्हणून त्यांच्याकडे जगाने आदरपूर्वक पाहिले. पाच दशकांपुर्वी पर्यावरण क्षेत्रातल्या मूलभुत समस्यांची दूरदृष्टीने जाण ठेऊन 'मेक इन इंडिया'चा पाया ज्यांनी परिश्रमपुर्वक रचला त्या कर्मयोग्यांमध्ये भवरलालजींच्या निसर्गदुतालाही अग्रस्थान आहे. भारतातीलसामान्य शेतकऱ्यांसाठी झटणाऱ्या भवरलालजींचे नवतंत्रज्ञान जगभरातल्या प्रगतशील शेतकऱ्यांनाही अत्यंत उपयोगी ठरले आहे. त्यांची ही कर्तबगारी अधोरेखित करण्याच्या दर्जाची आहे. सौर ऊर्जेवर चालणाऱ्या स्वदेशी तंत्रज्ञानाची जोड देऊन स्वदेशी तत्वाने सौरपंपाचे उत्पादन करण्यातही प्रथम तसेच टिशुकल्चर केळीच्या 'ग्रॅण्डनाईन' या व्हरायटीतही अग्रेसर अशी अनेक कतृत्वाची शिखरे भवरलालजींनी सर केली आहेत. हजारो शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी भवरलालजींनी महाराष्ट्र शासनाच्या अनुमतीने साकारलेला 'कांताई बंधारा'अनेक उद्योजकांना खेड्याकडे चला,भूमिपुत्रांचे कल्याण करा! हा कृतीशिल संदेश देणारा ठरला. भवरलालजींची जागतिक ठिबक सिंचन कंपनी ही आज अग्रगण्य आणि दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यांचा आंबा प्रक्रिया प्रकल्प आज जगात प्रथम क्रमांकावर आहे. उतिसंवर्धन केळांमध्ये सुध्दा ते जगात अग्रेसर आहेत.

कृतज्ञतेला 'मातृगुण' मानणाऱ्या भवरलालजींची राष्ट्रभक्ती अनुकरणीय राहिली. भारतीय विचारधारेतून प्राप्त झालेल्या संस्कृतीनिष्ठ मूल्यांचे भरलालजींना सदैव भान होते. संयुक्त कुटुंब पध्दतीतील उच्चतम जीवन-जाणिवांचे संवेदनशीलपणे आचरण त्यांनी केले. स्वत:च्या कुटुंबासोबत हजारो-लाखो लोकांना विस्तारीत कुटुंबाचे सदस्य म्हणुन आपलं मानलं. हेही त्यांचं वेगळेपण! त्यांच्या सामाजिक बांधिलकीचा वसा आणि वारसा त्यांच्या परिवारात आणि सहकाऱ्यांमध्ये त्यांनी रूजवला.

ज्येष्ठ विचारवंत, गांधीवादी विचारांचे कृतीशिल पुरस्कर्ते म्हणून ख्यातनाम झालेल्या भवरलालजींनी मराठी भाषा, साहित्य,संस्कृतीसाठी भुषणावह ठरेल अशी साहित्यसंपदा निर्माण केली. भवरलालजींच्या सौभाग्यवती कांताई यांच्या समर्पित,सेवाभावी जीवन कार्याचा वत्सलतेने त्यांनी वेध घेतला असून भावनाप्रधान आणि तितकच वैचारीकदृष्ट्या उंचीचं ठरलेल्या 'ती

आणि मी' या आत्मकथनाने अनेक मराठी परिवारात सुसंवादाचे वातावरण निर्माण केले.

भवरलालजींनी शैक्षणिक क्षेत्रातही अनुभूती रेसिडेन्शियल स्कूल आणि अनुभूती इंग्लिश मेडीयम स्कूल या शाळा सुरू केल्या. सर्वसाधारण गरीब कुटुंबातील गुणवान मुला-मुलींना जर शिक्षणासाठी उत्तम सुविधा करून दिली, पोषक आहार दिला, जगणं भक्कम करणारे विचार दिले तर ते या समाजात फार मोठं परीवर्तन घडवू शकतात या दूरदृष्टीने त्यांनी 'अनुभूती' शाळेची निर्मिती केली. या शाळेतील विद्यार्थी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी नक्कीच योगदान देतील याची सर्वांना खात्री आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या कृतीशील आचार विचारांच्या प्रचार-प्रसारासाठी त्यांनी सुरू केलेले कार्य फार महनीय आहे. जळगाव येथे गांधी तीर्थात सुरू झालेले 'गांधी रिसर्च फाऊंडेशन' मधे जगभरातील गांधी साहित्याचे केलेले संकलन अजोड आहे. येथे जगभरातील अभ्यासक व संशोधकां सोबतच सामान्यां पर्यंत गांधी विचार पोहचावा आणि तो त्यांनी आचरणात आणावा यासाठी भवरलालजींनी ८१ हजार स्के.फुटाचे जगातील पहिले ऑडिओ गाइडेड मल्टीमिडीया संग्रहालय जळगावात जैन हिल्स येथे उभारलय. गांधीजींनी दाखविलेला मार्ग अवलंबिता यावा, यासाठी त्यांच्या विविध रचनात्मक कार्याची प्रात्यक्षिके या फाऊंडेशनतर्फे सुरू झाली असुन, आजच्या पिढीला ती नक्कीच मार्गदर्शक ठरत आहेत. आजमितीला जगभरातील आठ लाखांच्यावर विद्यार्थ्यांनी व बंदीजनांनी 'गांधी विचार संस्कार परीक्षा' दिली असून दरवर्षी ही संख्या अधिकाधिक वाढतेच आहे.

महात्मा गांधीजींच्या 'स्वावलंबी'खेड्याची संकल्पना साकार करताना ग्रामसुधारणे सोबतच खेडेगावातील सामाजिक पर्यावरण महिलांना सन्मान देणारे, निर्व्यसनी, स्वच्छ, सुंदर, निकोप, निरोगी राहण्या बाबतही भवरलालजी आग्रही असायचे. महत्वाचे म्हणजे खेड्यातील प्रत्येकाला आर्थिक प्रगतीची संधी मिळावी आणि त्यातुन सामाजिक परीवर्तन व्हाव ही त्यांची अपेक्षा! खानदेशातील काही खेडेगावात या दृष्टीने त्यांनी केलेले काम जरूर पाहण्यासारखे आहे. वॉटरशेड, वॉटर हार्वेस्टींग, वॉटर कंझर्वेशन अशी अत्यंत पथदर्शक कामे भवरलालजींनी कृतीशिलपणे जैन हिल्स येथे स्वत: साकार केली. महाराष्ट्रातल्या गावोगावच्या शेतकऱ्यांनी ही कामे बघितली आणि त्यातून फार मोठी प्रेरणा घेतली.

भवरलालजींनी विद्येला विनयाची जोड दिली, साधनेला सातत्याची,श्रध्देला बुध्दीची,सामर्थ्याला संयमाची, आणि धनाने-कीर्तीने मोठे झाल्यावरही कर्तुत्वाला दातृत्वाची जोड दिली. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे महनमंगल यशोशिखर म्हणजे त्यांनी प्राप्त झालेल्या प्रतिष्ठेला सेवेची जोड दिली. एका आयुष्यात काम करून दाखविणाऱ्या अशा या कर्तृत्ववान, श्रमतपस्वी-ध्येयवेड्या भुमीपुत्राविषयी सर्वांना नितांत आदर आहे.

अल्पशा आजाराने दि २५ फेब्रुवारी २०१६ रोजी वयाच्या ७९ वर्षी भवरलालजी अनंताच्या प्रवासाला निघून गेले.

स्व. भवरलालजींच्या जीवनकार्याचा हा आलेख जेव्हा आपण पाहतो तेव्हा त्यांनी ७९ वर्षाच्या आयुष्यात हे कसे साध्य केले याचे आश्चर्य वाटते. त्यांच्या कामाची गती अफाट होती. कोणत्याही आव्हानापासून ते डगमगले नाहीत. त्यांच्या प्रत्येक कृतीत धाडस होते. हाती घेतलेल्या कोणत्याही कामात ते एकाग्रता साधून कामे तडीस नेत. त्यांच्या अंगी असलेली हि गुणवैशिष्ट्ये त्यांच्या अशोक, अनिल, अजित, अतुल या चारही सुपुत्रात बिंबलेली आहेत. स्व. भाऊंच्या जीवनकार्याचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून त्यांचे कार्य पुढे समर्थपणे नेण्यास त्यांची पुढची पिढी सक्षम आहे हे निश्चित. ●